# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**दौंड (जि.पुणे) तालुक्यातील मळद उपसा सिंचन योजनेचा आराखडा तयार करण्याबाबत**

**(१) ३५०४ (२३-१२-२०१४). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील नवा मुठा उजवा कालवा कि.मी. १२५ मधून उपसा करुन पावसाळ्यात मळद तलाव भरणेच्या कामासाठी मळद उपसा सिंचन योजनेस कृष्णा खोरे विकास महामंडळाने सन १९९९-२००० मध्ये प्रशासकीय मान्यता दिली होती, तसेच या योजनेच्या कामाची रुपये ४९ लक्ष ची निविदा सन १९९९-२००० मध्ये काढली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही या मळद उपसा सिंचन योजनेचे काम सुरु न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, मळद उपसा सिंचन योजनेची मुख्य पाईपलाईन वनक्षेत्रातून येत असल्याने तत्कालीन लोकप्रतिनिधींनी सूचविल्यानूसार बदलेल्या संरेखाप्रमाणे नवि मुठा उजवा कालवा क्र.१२९/०६० येथून योजना सुरु करणे संदर्भात घेण्यात आलेल्या निर्णयानुसार या प्रस्तावित उपसासिंचन योजनेचा आराखडा तयार करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, मळद उपसा सिंचन योजनेच्या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) योजनेची पाईपलाईन वन विभागाच्या हद्दीतून जात असल्यामुळे वन विभागाने हरकत घेऊन काम सुरुवातीच्या टप्प्यातच बंद पाडले. तसेच वन विभागाने हरकती घेतलेल्या जमिनी ऐवजी पर्यायी संरेखेनुसार अंदाजपत्रक तयार करुन त्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव क्षेत्रिय स्तरावर तयार करण्यात आला होता. तथापि सद्य:स्थितीत नवीन उपसा सिंचन योजना हाती न घेण्याचे शासनाचे धोरण असल्यामुळे त्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत नवीन उपसा सिंचन योजना हाती घेणे नियोजित नाही.

---

**विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील बोरांडे ग्रामपंचायतीमधील शीळ गावठाण या ठिकाणी मनरेगा सिंचन विहिरीच्या लाभार्थ्यांना त्यांच्या कामाचा मोबदला मिळण्याबाबत**

**(२) २७२४२ (१७-०८-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील बोरांडे ग्रामपंचायतीमधील शीळ गावठाण या ठिकाणी मनरेगा सिंचन विहिरीच्या लाभार्थ्यांना सन २०११-२०१२ मध्ये मंजूर झालेल्या सिंचन विहिरींच्या बांधकामाच्या पुर्ततेसाठी झालेल्या दिरंगाईमुळे लाभार्थ्यांना कुशल कामाचे पैसे अद्यापही देण्यात आलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, शीळ गावच्या विहिरीचाच प्रश्न नसून अन्य ६०० विहिरीबाबत हाच प्रकार मनरेगाच्या योजनेत घडला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन या मनरेगा योजनेमधील आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०३-११-२०१७) :** (१) ही बाब खरी नाही.

विक्रमगड तालुक्यात बोरांडा ग्रामपंचायत शीळ गावठाण ठिकाणी मनरेगा सिंचन विहिरीच्या लाभार्थ्यांना सन २०११-१२ या आर्थिक वर्षात बोरांडा ग्रामपंचायत मधील सिंचन विहिरीच्या लाभार्थ्यांना झालेल्या कामांच्या मुल्यांकनानुसार कुशल व अकुशल कामाचे पैसे MIS ऑनलाईन खालीलप्रमाणे अदा करण्यात आलेले आहेत. ज्या लाभार्थ्यांनी सिंचन विहिर बांधकामासाठी साहित्य घेतलेले होते अशा एजन्सीचे कुशल साहित्य बीले ही ग्रामपंचायतमार्फत मनरेगा विभाग, पंचायत समिती विक्रमगड यांना देण्यात आलेली असून झालेल्या कामाच्या मुल्यांकनानुसार संबंधित ग्रामपंचायतीला EFMS व्दारे कुशल निधी देण्यात येऊन ग्रामपंचायतीमार्फत एजन्सीच्या नावाने कुशल रक्कम वितरीत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | लाभार्थ्यांचे नाव | अकुशल रक्कम | कुशल रक्कम | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.बारक्या विठू गोवारी | ८१७६८ | १०७१३१ | १८८८९९ |
| २ | श्री.लक्ष्मण बाळू टोकरे | ५४५७० | ८०८१९ | १३५३८९ |
| ३ | श्री.बजी यशवंत घानवा | ७६८४२ | ९४६३४ | १७१४७६ |
| ४ | श्री.माणिक जान्या लाहांगे | ६२००९ | ८९९६६ | १५१९७५ |
| ५ | श्री.काशिनाथ लक्ष्मण टेला | ७६९१० | १०५६५६ | १८२५६६ |
| ६ | श्री.लक्ष्मण देवू तावडी | ७७१४४ | ९५५९७ | १७२७४१ |
| ७ | श्री.अनंता तुकाराम भुयाळ | ६७६१६ | १००५७२ | १६८१८८ |
| ८ | श्री.लघु छाया गोवारी | ७१०२८ | ९०५०४ | १६१५३२ |
| ९ | श्री.शंकर मऱ्ह्या दांडेकर | ५५६१८ | ६३७४४ | ११९३६२ |
| १० | श्री.सदु लाडक्या वारगा | ६५३६७ | ५४१२३ | ११९४९० |

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) हे खरे नाही.

विक्रमगड तालुक्यात सन २०११-१२ या आर्थिक वर्षात ६०७ सिंचनविहिरी घेण्यात आल्या होत्या त्यापैकी ५९९ सिंचन विहिरींची कामे सुरु करण्यात आली असून ८ सिंचन विहिरींची कामे सुरु करण्यात आली नाहीत. ९३ विहिरींची कामे पूर्ण झाली असून विहिरींचे पूर्णत्वाचे दाखले ऑनलाईन करण्यात आलेले आहेत. ३४३ विहिरी भौतिकदृष्टया पूर्ण असून पूर्णत्वाचे दाखले मिळताच ऑनलाईन करण्यात येतील तसेच १६३ सिंचन विहिरींची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ब्रम्हपुरी (जि.चंद्रपूर) तालुक्यातील पिंपळगाव (भो.) येथील मनरेगाच्या कामगारांना मजूरी देण्याबाबत

**(३) ३५०६१ (२५-०५-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपुरी (जि.चंद्रपूर) तालुक्यातील पिंपळगाव (भो.) येथील मनरेगाच्या कामगारांना मजूरी मिळाली नाही, या प्रकरणाची वरिष्ठ पातळीवर चौकशी करुन मजूरांना न्याय मिळवून देण्याची मागणी मा.ग्रामविकास राज्यमंत्री यांच्याकडे दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास शिवसेनेच्या प्रा. अमृत नखाते यांनी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) तसेच या मजूरांना तातडीने मजूरी मिळण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. जयकुमार रावल (०२-११-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी जिल्हास्तरीय चौकशी समितीमार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशी समितीने ज्या ७१ बोगस मजुरांच्या खात्यात रु.२,०५,८०५/- रक्कम जमा आहे ती रक्कम प्रत्यक्षात काम करणाऱ्या १२१ मजुरांच्या खात्यात वर्ग करण्याचे आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

प्रत्यक्ष काम करणा-या १२१ मजुरांपैकी ८९ मजुरांच्या खात्यात रु.१,३८,६००/- इतकी रक्कम RTGS प्रणालीद्वारे जमा करण्यात आली असून उर्वरित ३२ मजुरांची रक्कम जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**मराठवाड्यातील लोअर दुधना सिंचन प्रकल्पाचे धरण, भूसंपादन, कालवे व वितरण व्यवस्थेसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४) ३६५७८ (२०-०१-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील लोअर दुधना सिंचन प्रकल्पाचे धरण, भूसंपादन, कालवे व वितरण व्यवस्थेसाठी सुमारे रु. ९०० कोटी आणि गुणनियंत्रण, उपसा सिंचन योजना, लाभ क्षेत्र विकासाची कामे करण्यासाठी सुमारे रु. २०० कोटी असा एकूण ११०० कोटी रुपयाचा प्रस्ताव सिंचन विभागाच्या अभियत्यांनी गोदावरी खोरे विकास सिंचन महामंडळाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याची कारणे काय आहेत आणि या प्रस्तावावर निर्णय केव्हा घेण्यात येणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१०-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

निम्न दुधना प्रकल्प, ता.सेलू, जि.परभणी या प्रकल्पाचे तृतीय सुधारीत अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या कार्यवाहीसाठी मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांनी प्रस्ताव महामंडळास सादर केला आहे. सदरील प्रस्तावाची राज्यस्तरीय तांत्रिक सल्लगार समितीने छाननी केली असून प्रस्तावाची छाननीनंतरची किंमत रु.२३४१.६७ कोटी एवढी आहे. त्याबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| **१** | तृतीय सुप्रमाची किंमत | रु.२३४१.६७ कोटी |
| **२** | ३१ मार्च २०१५ पर्यंतचा खर्च | रु.१३८०.०५ कोटी |
| **३** | उर्वरीत किंमत | रु.९६१.६२ कोटी |
| **४** | धरण, कालवे, वितरण व्यवस्था, उ.सिं.यो. पुनर्वसन, भूसंपादन इ. कामे | रु.७९५.५९ कोटी |
| **५** | लाक्षेवि कामे | रु.१४९.८८ कोटी |
| **६** | आस्थापना व इतर | रु.१६.१५ कोटी |
| **७** | एकूण उर्वरीत किंमत | रु.९६१.६२ कोटी |
| **८** | सन २०१५-१६ मधील निधी तरतूद | रु.१५२.८३९ कोटी |

(२) सदरील सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास दि.१२/२/२०१६ अन्वये राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने शिफारस केली आहे. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद या महामंडळाच्या नियामक मंडळाची मान्यता घेणेची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डिग्रस (ता.पालम, जि.परभणी) येथील गोदावरी नदिवरील बंधारा पुर्ण क्षमतेने भरण्याबाबत**

**(५) ३९५७७ (२२-०१-२०१६). श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डिग्रस (ता.पालम, जि.परभणी) येथे गोदावरी नदीवर उच्चपातळी बंधारा बांधण्यात आलेला असुन, त्या बंधाऱ्यात पाणी पुर्ण क्षमतेने अडवण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुडीत क्षेत्रातील धानोरा काळे गावानजीक रा.मा.क्र. २३५ वरील पुल जुन्या पुलाच्या अप्पर भागावर नविन पुल बांधल्यास बंधारा पुर्ण क्षमतेने भरला जाऊ शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बंधारा पुर्ण क्षमतेने भरण्यासह रा.मा. २३५ वर पुल बांधकामाबाबत प्रस्ताव शासनाकडे प्रस्तावित आहे काय व नविन पुलास शासन मंजुरी देणार आहे काय ?

**श्री. गिरीष महाजन (१०-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) दिग्रस बंधारा पूर्ण क्षमतेने भरल्यास रा.मा.क्र. २३५ वरील गोदावरी नदीवर अस्तित्वात असलेला धानोरा (काळे) येथील पूल बुडणार आहे. सदर ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नवीन पूल, ठेव काम म्हणून बांधणे प्रस्तावित असून या पुलाचे रु.२,४१४ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केले आहे. सदर अंदाजपत्रकास मान्यतेबाबतची पुढील कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

बुडीत क्षेत्रातील भूसंपादनासाठी रु.८४८५.०० लक्ष व बुडीत क्षेत्रातील इतर लहान २० पुलांसाठी रु.११९७.०० लक्ष असे एकूण रु.१२०९६.०० लक्ष एवढ्या निधीची आवश्यकता आहे. निधी उपलब्धतेनुसार उपरोक्त कामे पूर्ण करणे नियोजित आहे.

---

**मराठवाडयातील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गतच्या कामाबाबत**

**(६) ५५६३० (११-०८-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत मराठवाडयातील औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद व लातूर या आठ जिल्हयांमध्ये शासकीय यंत्रणेने निश्चित केलेली कामे (शेल्पवरील कामे) १ लाख १० हजार ३४ इतकी असली तरी माहे एप्रिल, २०१६ अखेर या योजनेंतर्गत प्रत्यक्ष ६ हजार ७४४ इतकीच कामे सुरु होती व तफावतीमुळे योजनेतील कामे नियोजनानुसार होत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आठ जिल्हयांमध्ये शेल्फवरील कामांची संख्या लक्षात घेता त्यांची मजूर क्षमता ३ कोटी इतकी असून एकूण १,०३,०६९ इतकेच मजूर काम करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नियोजनानुसार कामे न करणाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०६-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही मजुरांच्या काम मागणीवर आधारीत योजना आहे. औरंगाबाद विभागातील आठही जिल्ह्यामधील ग्रामीण भागातील मजुरांनी कामाची मागणी केल्यावर विहीत मुदतीत त्यांना कामे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

दि.७/४/२०१६ ते १३/४/२०१६ अखेरचा कामाचा साप्ताहिक सरासरी मजुर उपस्थिती अहवालानुसार एकूण ६७४४ कामे सुरु होती व त्यावर १०३०६९ मजुर उपस्थिती होती. तसेच विभागामध्ये मजुरांना काम मिळत नसल्याबाबत तक्रारी आढळून आलेल्या नाहीत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गंगापूर (जि.नाशिक) धरणातून पाण्याचा विसर्ग बंद केल्याबाबत**

**(७) ५७००८ (११-०८-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरीचे (जि.नाशिक) पात्र गंगापूर धरणातून पाण्याचा विसर्ग बंद केल्यामुळे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान कोरडे पडले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यटकांबरोबरच धार्मिक विधीसाठी येणारे भाविकही नाशिक येथे येत नसल्याने तेथील अनेक व्यावसायिकांवर बेकारीची पाळी आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गोदावरी पात्रात पाणी सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१७) :** (१) पावसाळ्यात धरणातील अतिरिक्त येणारा येवा सांडव्याद्वारे नदीपात्रात सोडला जात असल्यामुळे ऑक्टोबर, २०१५ नंतर गंगापूर धरणातून पाणी सोडणेत आलेले नव्हते.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौदा (जि.नागपूर) तालुक्यात दारिद्रय रेषेखालील यादीमध्ये सधन कुटुंबाचे नावे समाविष्ट केल्याबाबत

**(८) ६५४२६ (१६-१२-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौदा (जि.नागपूर) तालुक्यात सधन कुटुंबाची नावे दारिद्रय रेषेखालील यादीत समाविष्ट आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यात राजकीय नेत्यांचा व कार्यकर्त्यांनी दबावाखाली दारिद्रय रेषेखाली यादी तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून श्रीमंत व सधन कुंटुबांची नावे यादीत समाविष्ट केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दारिद्रय रेषेखालील यादीत अनेक जणांकडे शेतजमीन आहेत परंतू भूमीहीन मजुरांची नावे दारिद्रय रेषेखालील यादीत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०६-११-२०१७) :** (१), (२) व (३) नाही, हे खरे नाही.

दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे निश्चित करण्याकरिता राज्यात कुटुंब गणना-२००२ करण्यात आली. याअंतर्गत सामाजिक व आर्थिक सर्वेक्षणांआधारे (Score Based Ranking नुसार) दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले.

नागपूर जिल्ह्यातही विहित कार्यपध्दतीनुसार सदर सर्वेक्षण करण्यात आले आहे. सदर सर्वेक्षणादरम्यान तयार करण्यात आलेली दारिद्र्यरेषेखालील लोकांची यादी प्रसिध्द करुन त्यावर प्राप्त आक्षेपांच्या तपासणीनंतर संबंधित ग्रामसभेची अंतिम मंजूरी घेवूनच सन २००७ मध्ये अंतिम यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ताडाळा (ता.मूल, जि.चंद्रपूर) येथे जलशिवार योजनेतंर्गत महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून बांधण्यात आलेला बंधारा वाहून गेल्याबाबत

**(९) ६५५१५ (१६-१२-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडाळा (ता.मूल, जि.चंद्रपूर) येथे जलशिवार योजनेतर्गत महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून चालू आर्थिक वर्षात बापूजी धामणे यांच्या शेताजवळील नाल्याच्या बंधाऱ्याचे बांधकाम नित्कृष्ट दर्जाचे केल्यामुळे अवघ्या काही महिन्यातच बंधारा वाहून गेल्याची माहिती दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार अधिकारी व कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०२-११-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मूल यांनी सदर प्रकरणी चौकशी केली असून चौकशीअंती दोषी आढळून आलेले संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक, पंचायत समिती, मूल येथील पॅनल तांत्रिक अधिकारी व शाखा अभियंता यांच्यावर कारवाई सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नायगाव (जि.नांदेड) तालुक्यातील मन्याड नदीवरील जुने सिंचनक्षेत्र कोरडे करुन लिंबोटीचे पाणी उदगीरला सोडण्याबाबत**

**(१०) ६८३३० (०६-०१-२०१७). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायगाव (जि.नांदेड) तालुक्यातील मन्याड नदीवरील जुने सिंचनक्षेत्र कोरडे करुन लिंबोटीचे पाणी उदगीरला सोडण्याचा निर्णय झाला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,उदगीरला पाणी देण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.
उदगीर शहरास पिण्याचे पाणी देण्यासाठी शासनाने शासन निर्णय क्र. बिसिंआ-२०१६/(४७/१६)/सिंव्य(धो), दि.०९/०८/२०१६ अन्वये, उर्ध्व मानार (लिंबोटी) मध्यम प्रकल्पातून परवानगी दिली आहे.
(२) कार्यवाही प्रस्तावित नाही. तसेच प्रकरण मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे न्यायाप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दौंड (जि.पुणे) तालुक्यातील भीमा नदीवर उजनी धरण प्रकल्पातील पाण्याच्या फुगवट्यामध्ये बुडीत बंधारे बांधण्याबाबत

**(११) ७३३७५ (०२-०१-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील भीमा नदीवर उजनी धरण प्रकल्पातील पाण्याच्या फुगवट्यामध्ये बुडीत बंधारे बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीची मागणी माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,देऊळगावराजे, वडगाव दरेकर, पेडगाव, शिरापूर, हिंगणीबेर्डी, मुगाव (ज्योतिबा नगर) मलठण, वाटलूज, नायगाव, राजेगाव व खानोटा या गावांच्या भागात बुडीत बंधारे नसल्यामुळे माहे जानेवारी नंतर या भागात भीषण पाणीटंचाई निर्माण होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भीमा नदीवर उजनी धरण प्रकल्पातील पाण्याच्या फुगवट्यामध्ये व देऊळगावराजे, वडगाव दरेकर, पेडगाव, शिरापूर, हिंगणीबेर्डी, मुगाव (ज्योतिबा नगर) मलठण, वाटलूज, नायगाव, राजेगाव व खानोटा या गावांच्या भागात बुडीत बंधारे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-११-२०१७) :** (१) पुणे जिल्हयातील दौंड तालुक्यातील भीमा नदीवर उजनी जलाशयाच्या बुडीत क्षेत्रामध्ये बंधारे बांधण्याबाबत श्री. राहुल कुल (दौंड), विधान सभा सदस्य यांनी त्यांच्या दिनांक २०/६/२०१६ च्या पत्रान्वये पालकमंत्री, पुणे यांच्याकडे मागणी केली आहे. सदरहू मागणी केलेले पत्र/निवेदन अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर यांच्या कार्यालयात प्राप्त झालेले आहे.

(२) निवेदनात उल्लेख केलेल्या दौंड तालुक्यातील देऊळगाव राजे, वडगाव दरेकर, पेडगाव, शिरापूर, हिंगणीबेर्डी, मुगाव (ज्योतिबा नगर), मलठण, वाटलूज, नायगाव, राजेगाव व खानोटा या गावामध्ये नळ पाणी पुरवठा सुरु आहे. ही गावे टंचाईग्रस्त नसल्याने सन २०१६-१७ मध्ये टंचाई कालावधीत पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना घेण्यात आलेल्या नाहीत असे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने कळविले आहे.

(३) जलसंधारण विभागामार्फत बुडित बंधाऱ्यांचे प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले आहे. उजनी प्रकल्पाचे मंजुर प्रकल्प अहवालात जलाशयामध्ये बुडित बंधारे बांधण्याची तरतुद नाही. तथापि, उजनी जलाशयामध्ये बुडित बंधारे बांधल्यामुळे उजनी प्रकल्पाचे पाणी नियोजनावर परिणाम होणार असल्यामुळे याबाबत शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक असल्याचे महामंडळाने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील भोम आणि टाकीगाव दरम्यानच्या भागातील बांधबंदिस्ती फुटल्याने भात शेतीचे झालेले नुकसान**

**(१२) ७५५९८ (१७-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारभूमि विभागाने खारबंदिस्तीची दुरुस्ती न केल्यामुळे रायगड जिल्ह्यातील भोम आणि टाकीगाव दरम्यानच्या भागातील बांधबंदिस्ती फुटल्याने हरिश्चंद्र पिंपळे, हरिश्चंद्र कोठा आणि चिखली भोम भागातील चिरनेर, टाकीगाव, विंधणे, भोम आणि धाकटी जुई या गावातील शेतकऱ्यांच्या सुमारे पाचशे एकर भातशेतीत माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान खारे पाणी शिरले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या शेतकऱ्यांना पुढील तीन वर्षे भाताचे पिक घेता येणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार सदरचे खारबंदिस्तीची दुरुस्ती करण्यासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-११-२०१७) :** (१) नाही.

रायगड जिल्हा उरण तालुक्यातील हरिश्चंद्र पिंपळे खारभूमी योजना व चिखलीभोम-हरिश्चंद्रकोठा खारभूमी योजना या दोन्ही योजना बृहत आराखडयात समाविष्ट नाहीत. या खाजगी खारभूमी योजना आहेत. चिरणेर, टाकीगाव, विंधनेभोम आणि धाकटी जुई ही गावे चिखलीभोम-हरिश्चंद्रकोठा खाजगी खारभूमी योजनेच्या पुन:प्रापित क्षेत्रात येतात. सदर योजनेवर सध्या शासनामार्फत खर्च करण्यात येत नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माळशेज (ता.मुरबाड,जि.ठाणे) घाट पर्यटन स्थळांच्या ठिकाणी व परिसरातील गाव पाड्यांना पिंपलजोगा धरणातून पाणी मिळण्याबाबत**

**(१३) ७६८२३ (२०-०४-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील माळशेज घाट पर्यटन स्थळांच्या ठिकाणी व परिसरातील गाव पाड्यांना पिण्याच्या पाण्यासाठी जुन्नर तालुक्यातील पिंपलजोगा धरणातून पाणी मिळण्यासाठी ठाणे ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने शासनाकडे प्रस्ताव दाखल केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त प्रस्तावास मंजूरी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-११-२०१७) :** (१) होय.
(२) सदर प्रस्तावावरील त्रुटींची पूर्तता क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण - डोंबिवली महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावांमध्ये पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(१४) ७६९५३ (२१-०४-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावांना पुरेसा पाणी पुरवठा उपलब्ध व्हावा यासाठी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये झालेल्या बैठकीत १० टक्के अतिरिक्त कोटा मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर एमआयडीसीच्या पाणी घेण्यावर लघु पाटबंधारे विभागाने निर्बंध घातल्याने २७ गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, २७ गावांमधील पाणी टंचाई सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-११-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाक्षेवि) यांचे अध्यक्षतेखाली दि.२८/०९/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत या २७ गावांकरिताची पाणीपुरवठयाची गरज ही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेसमवेत ५८३ द.ल.ली./दिन मंजूरीच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यामध्ये असलेली १० टक्के जादा पाणी उचलाच्या मर्यादेमधुनच भागविण्याबाबत निदेश देण्यात आलेले आहेत
(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मंजूर पाणी मर्यादेत पाणी उचलण्यास निर्बंध घातलेले नाहीत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदर्श ग्राम योजनेत समावेश करण्यात आलेल्या गावांच्या विकास कामासाठी निधी मिळण्याबाबत**

**(१५) ७७८८१ (१४-०४-२०१७). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागाचा विकास व्हावा यासाठी शासनाने सुरु केलेल्या 'आदर्श ग्राम योजने' अंतर्गत राज्यातील किती गावांचा समावेश सदर योजनेत करण्यात आला आहे,

(२) असल्यास, आडे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) या गावाची भांडूप (प.) येथील लोकप्रतिनिधींनी निवड केली असून सदर गावाचा विकास आराखडा तयार करण्यासाठी प्रभारी अधिकारी म्हणून प्रभारी उपअभियंता, बांधकाम विभाग, जिल्हापरिषद, दापोली यांची नियुक्ती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापही सदर योजनेत समावेश करण्यात आलेल्या गावांच्या विकास कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर योजनेंतर्गत समाविष्ठ करण्यात आलेल्या गावांच्या विकास कामासाठी तात्काळ निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०६-११-२०१७) :** (१) आमदार आदर्श योजनेंतर्गत माहे मे, २०१७ अखेर राज्यातील ३१४ ग्रामपंचायतींची निवड केलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) ग्राम विकास विभागाच्या दिनांक ०८ ऑक्टोबर, २०१५ च्या परिपत्रकान्वये या योजनेमध्ये झालेल्या ग्रामविकास आराखड्यातील विविध विभागांशी चर्चा करुन जिल्हाधिकारी यांनी करणेबाबत सुचना केलेल्या आहेत. सदर योजनेंतर्गत स्वतंत्ररित्या प्रत्यक्षपणे निधी उपलब्ध करुन देण्याचे धोरण नाही.

तसेच ग्रामविकास विभागाच्या दिनांक ०४ मे, २०१७ च्या परिपत्रकानुसार आमदार महोदयांनी निवडलेल्या ग्रामपंचायतीमध्ये राज्य योजना प्राधान्याने राबविण्याबाबत योजनांच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये योग्यतो बदल करुन त्यानुसार संबंधित योजनांची अंमलबजावणी करणेबाबत सर्व प्रशासकीय विभागांना सुचना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लासलगांव (ता.निफाड, जि.नाशिक) यांनी पाठविलेल्या विकास आराखड्याप्रमाणे विकासकामांना मंजूरी देण्याबाबत**

**(१६) ७८१७१ (१५-०४-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासलगांव (ता.निफाड, जि.नाशिक) येथील ग्रामपंचायतीने आमदार आदर्श ग्राम योजनेंतर्गत विकासकामे करण्यासाठी दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या ग्रामसभेत सन २०१६-१७ च्या विकास आराखड्याला मंजुरी घेऊन हा विकास आराखडा जिल्हाधिकारी, नाशिक यांना पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच विकास आरखड्याप्रमाणे विकासकामे मंजूर करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींने दिनांक १६ नोव्हेंबर,२०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हा प्रशासनाकडे मागणी केलेली होती परंतु सदर विकासकामे माहे जानेवारी २०१७ पर्यंत मंजूर झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार विकास आराखड्याप्रमाणे विकासकामांना मंजूरी देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०६-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
जिल्हा नियोजन समितीमार्फत सन २०१७-१८ चे जिल्हा वार्षिक योजनेत ग्रामविकास आराखड्यातील कामांचा प्राधान्याने विचार करण्यात येणार आहे.
(३) लागू नाही.
(४) लागू नाही.
(५) लागू नाही.

---

**राज्यातील अनुदानित आश्रमशाळेला देण्यात येणारे अनुदान वाढविण्याबाबत**

**(१७) ७८७११ (२१-०४-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने राज्यातील अनुदानित आश्रमशाळेला देण्यात येणारे अनुदान अत्यंत कमी असल्याने सदर अनुदान वाढविण्यासाठी व त्याचा अहवाल देण्यासाठी राज्याचे मुख्य सचिव, आदिवासी विकास, समाजकल्याण विभाग व महिला व बालविकास विभाग यांच्या सचिवांची एक समिती गठीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालातील शिफारशीचे स्वरूप काय आहे व त्यानुषंगाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०७-११-२०१७) :** (१) होय.
(२) (३) व (४) समितीचा अहवाल प्राप्त झालेला नाही.

---

## हिंगणघाट व समुद्रपूर (जि.वर्धा) तालुक्यातील खचलेल्या व बुजलेल्या विहीरींचे बांधकाम अपुर्णवस्थेत असल्याबाबत

**(१८) *८१४५१* (१५-०४-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट व समुद्रपूर (जि.वर्धा) तालुक्यातील खचलेल्या व बुजलेल्या विहीरींचे बांधकाम अपुर्णवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विहीरींची शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार उक्त विहीरींचे सर्व्हेक्षण करुन विहीरीचे बांधकाम पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०२-११-२०१७) :** (१) हे खरे आहे.

हिंगणघाट तालुक्यातील खचलेल्या व बुजलेल्या एकूण १७३ विहिरींपैकी १६ विहिरींची कामे अपुर्णावस्थेत असून ११२ विहिरींचे बांधकाम पूर्ण झाले आहे व उर्वरित ४५ विहिरींची कामे सुरु झालेली नाहीत.

समुद्रपूर तालुक्यातील एकूण १८१ विहिरींपैकी ९१ विहिरींची कामे पूर्ण झालेली असून २६ विहिरींची कामे अपूर्ण आहेत. उर्वरित ५६ विहिरींची कामे सुरु झालेली नसून ७ विहिरी रद्द करण्यांत आल्या आहेत. तसेच १ विहिर नगर पंचायत झाल्याने वळती करण्यांत आलेली आहे.

(२) व (३) सदर विहिरींची पाहणी संबंधित यंत्रणेकडून करण्यात आली असता पाहणीत विहिरी पात्र असल्याचे दिसून आले आहे. पात्र विहिरींना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून लाभार्थ्यांना विहिरीचे काम सुरु करण्याबाबत पत्र देण्यात आलेले आहे.

(४) सदर विहिरींचे कामावर मजूर उपलब्ध नसल्याने व लाभार्थी प्रतिसाद देत नसल्याने कामे सुरु करण्यास विलंब होत आहे.

---

## उस्मानाबाद जिल्ह्यातील मांजरा प्रकल्पावरील धरणाच्या दरवाज्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१९) *८३४७१* (१८-०४-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील मांजरा प्रकल्प हा जिल्हयातील मोठा प्रकल्पापैकी एक असून या प्रकल्पामधून उस्मानाबाद जिल्ह्यासह बांड व लातूर जिल्हयातील हजारो हेक्टर शेतीला सिंचनाला पाणीपुरवठा होतो परंतु मांजरा प्रकल्पावरील १८ पैकी ४ दरवाजे नादुरुस्त असल्याने दररोज लाखो लिटर पाणी वाया जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील दरवाज्याची दुरुस्ती तात्काळ करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री,मा.जलसंधारण मंत्री यांच्याकडे दिनांक ३१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच गळती झालेले पाणी परत धरणात टाकण्याची यंत्रणा प्रकल्पावर उपलब्ध असून सदरील यंत्रणा मागील सहा पेक्षा जास्त वर्षापासून बंद आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मांजरा प्रकल्पावरील नादुरुस्त दरवाजे दुरुस्ती करण्यासह गळती झालेले पाणी परत धरणात टाकण्याची बंद असलेली यंत्रणा पुन्हा चालू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-११-२०१७) :** (१) नाही.
(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २०/०२/२०१७ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय व मा.मंत्री (जलसंपदा) यांना निवेदन सादर केले आहे.
(३) नाही.
गळती झालेले पाणी परत धरणामध्ये टाकण्यासाठीची कोणतीही यंत्रणा प्रकल्पावर बसविण्यात आलेली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील खडकपूर्ण प्रकल्पातील (संत चोखा सागर) पाण्याचे खडकपूर्णा प्रकल्प नदीवरील नदीकाठच्या गावांना पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षण मिळणेबाबत**

**(२०) ८३७१५ (१८-०४-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील खडकपूर्ण प्रकल्पातील (संत चोखा सागर) पाण्याचे खडकपूर्णा प्रकल्प नदीवरील नदीकाठच्या गावांना पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षण मिळणेबाबत दिनांक ३० मार्च, २०१६ व दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी व यापूर्वी अनेकवेळा पत्राद्वारे मागणी करुनही अदयापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खडकपूर्णा प्रकल्पातील पाणी उक्त नदीच्या पात्रात सोडण्यासाठी मुळ प्रस्तावात कोणतीही तरतुद नसल्याने ती कायमस्वरुपी व्हावी म्हणून सातत्याने मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार खडकपूर्णा प्रकल्पांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-११-२०१७) :** (१) नाही.

स्थानिक लोकप्रतिनिधींकडून खडकपुर्णा प्रकल्पातून सिंदखेड राजा तालुक्यातील ४४ गावांना पिण्याचे पाणी आरक्षित करुन देणेबाबत पत्र प्राप्त झाली आहेत. त्यानुसार ४४ गावांकरीता मा.जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे अध्यक्षतेखाली दि.२८/१०/२०१६ रोजी संपन्न झालेल्या पाणी आरक्षण समितीच्या सभेमध्ये ८.०० दलघमी पाणी आरक्षण मंजुर करण्यात आले आहे.

त्यानुसार दि.०२.०२.२०१७ रोजी ३.०० दलघमी व दि.१३.०४.२०१७ रोजी ४.०० दलघमी पाणी प्रकल्पातुन नदीपात्रात सोडण्यात आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मागणीनुसार पिण्याचे पाण्यासाठी प्राध्यान्याने पाणी आरक्षण करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कोयना धरण पायथा व वैतरणा या जल विद्युत प्रकल्पाच्या नूतनीकरणाबाबत**

**(२१) ८४८०४ (११-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोयना धरण पायथा व वैतरणा या जल विद्युत प्रकल्पांचे नुतनीकरण व आधुनिकीकरण कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अंदाजपत्रकही तयार करण्यात आले आहे काय व सदर अंदाजपत्रकास शासनाने मान्यता व निधी उपलब्ध करुन दिला आहे काय,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१७) :** (१) नाही, कोयना धरण व पायथा व वैतरणा या जलविद्युत प्रकल्पांचे नुतनीकरण व आधुनिकीकरण कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील टाळंबा धरण प्रकल्पाचे काम पूर्णपणे बंद असल्याबाबत**

**(२२) ८६०६९ (२२-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ तालुक्यातील मानगांव खोऱ्यात असलेल्या तळ कोकणातील तालुका व गावामधील १२४ गावांना पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी मिळावे यासाठी मंजूर असलेल्या टाळंबा धरण प्रकल्पाचे काम पूर्णपणे बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त धरणाची पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, तद्नुसार टाळंबा धरण प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-११-२०१७) :** (१) तळंबा प्रकल्पग्रस्तांनी भूसंपादन नुकसान भरपाई व पुनवर्सनासंबंधीच्या मागण्यांसाठी धरणाचे बांधकाम नोव्हेंबर २०१३ पासून बंद केले आहे. परंतु निधीचे उपलब्धतेनुसार भूसंपादन व पुनर्वसन कामे सुरू ठेवून पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) १) नियोजित तळंबा प्रकल्पाचे काम निधीचे उपलब्धतेनुसार करण्यात येत आहे. कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाने दि. १९/६/२०१७ च्या ७० व्या बैठकीत पारित केलेला ठराव ७०/१२ अन्वये प्रकल्पाचे कालवे रद्द करून १४ को. प. बंधाऱ्यांद्वारे सिंचन करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.

२) या प्रकल्पाचा वनजमिन प्रस्ताव केंद्र शासनाच्या वन व महसूल विभागास सादर करणेच्यादृष्टीने मंत्रालयात दि.९-८-२०१७ रोजी मा.प्रधान सचिव (जसंप्र व वि) यांचेसोबत झालेल्या बैठकीत त्यांनी प्रकल्पाची उंची व पाणीसाठा कमी करण्याबाबतचा अभ्यास करून त्याप्रमाणे प्रकल्पाचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

त्या अनुषंगाने प्रस्ताव तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोकणासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याबाबत

**(२३) ८६०७६ (११-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्यासाठी भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद ३७१(२) मध्ये दुरुस्ती करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी दिनांक १२ मार्च,२०१५ रोजीच्या पत्रान्वये मा. वित्त व नियोजन मंत्री यांनी मा. केंद्रीय गृह मंत्री यांना केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीनुसार केंद्र शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०९-२०१७) :** (१) होय.
(२) व (३) कोकणासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याकरिता भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३७१ (२) मध्ये दुरूस्ती करणे आवश्यक असून सदर बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे.

---

**अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील भंडारदरा, निळवंडे धरणासह अन्य लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या निर्मितीतून विस्थापित झालेल्या १२ उपसा सिंचन योजना बंद असल्याबाबत**

**(२४) ८६५८७ (२१-०९-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील भंडारदरा, निळवंडे धरणासह अन्य लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या निर्मितीतून विस्थापित झालेल्या आदिवासी शेतकऱ्यांना त्यांच्या उर्वरित शेतजमिनीला पाणी व पिण्यासाठी पाणी मिळावे म्हणून १५ वर्षापूर्वी अकोले तालुक्यातील पश्चिम भागात कोटयवधी रुपये खर्च करुन सुरु झालेल्या १२ उपसा सिंचन योजना बंद झाल्याचे दिनांक १२ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनांची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी आदिवासींनी मा. राज्यपाल व मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-११-२०१७) :** (१) भंडारदरा प्रकल्पावरील ४ शासकीय उपसा सिंचन योजना (भंडारदरा-गुहीरे, गुहीरे-रंधा, शेंडी-रंधा व रंधा-कोंदणी) सन २००३ पासून विद्युत देयकांची अदायगी न झाल्याने बंद आहेत. दिनांक २१/२/२०११ रोजी मा.मंत्री (जलसंपदा विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत "आदिवासी क्षेत्रातील ४ शासकीय उपसा सिंचन योजना दुरुस्त न करता त्याच सभासदांना तेवढयाच क्षेत्रासाठी नवीन वैकल्पिक पाणी परवाने देण्यात यावेत" असा निर्णय झालेला आहे.

या व्यतिरिक्त भंडारदरा प्रकल्पावर (प्रवरा नदी ०३) तीन योजना आढळा मध्यम प्रकल्पावर (०१) एक योजना व मुळा नदीवर (०५) पाच सहकारी उपसा सिंचन योजना विद्युत देयक थकीत असल्यामुळे बंद पडलेल्या आहेत

(२) नाही, अशा प्रकारची कार्यवाही करण्याची कोणतीही मागणी केलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खडकपूर्णा प्रकल्पातंर्गत उंबरखेड लघुपाटाचे काम बंद असल्याबाबत**

**(२५) ८६६८९ (१८-०८-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकपूर्णा प्रकल्पातंर्गत उंबरखेड लघुपाटाचे काम गेल्या चार वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाकरिता शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या परंतु सदर जमिनीचा मोबदला अदयापी शेतकऱ्यांना देण्यात आलेला नसून यासंदर्भातील भूसंपादन प्रस्ताव

गेल्या दोन वर्षापासून मंजूरीकरिता उपविभागीय अधिकारी सिंदखेडराजा व जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तद्नुसार प्रकल्पाचे काम त्वरित सुरु करण्यासह शेतकऱ्यांना जमीनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-११-२०१७) :** (१) उंबरखेड लघुपाटाचे उर्वरित काम सन २०१५ पासून बंद आहे.

(२), (३) व (४) नाही, उंबरखेड लघुपाटासाठी ४.४९ हेक्टर क्षेत्राचा भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना सादर करण्यात आला होता. प्रत्यक्ष संयुक्त मोजणी प्रमाणे ४.४९ हेक्टर क्षेत्रापैकी १.९९ हेक्टर खाजगी क्षेत्राचा निवाडा जिल्हाधिकारी, बुलढाणा, यांनी दिनांक ३०.१२.२०१३ रोजी मंजुर केला असुन सर्व संबंधितांना मोबदला वाटप करण्यात आला आहे. या भागामधील लघुपाटाची कामे झालेली आहेत.

उर्वरित २.२० हेक्टर खाजगी क्षेत्राचा सरळ खरेदीचा प्रस्ताव विभागीय कार्यालयाचे पत्र दि.१९/७/२०१६ अन्वये उपविभागीय अधिकारी, सिंदखेडराजा, यांना सादर करण्यात आलेला आहे. नगर रचनाकार यांचे दर मंजुरीनंतर सदर प्रस्ताव मंजुरीसाठी जिल्हाधिकारी, बुलढाणा, यांना सादर होईल. तसेच संयुक्त मोजणीतील ०.३० हेक्टर सरकारी जमिनीचे हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येत आहे.

उंबरखेड वितरिकेचे उर्वरित काम त्वरीत सुरु करण्यासाठी सरळ खरेदीने जमिणीचा ताबा घेणेसाठी कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृष्णा खोऱ्यातील मराठवाड्याच्या हक्काचे पाणी उस्मानाबाद व बीड जिल्ह्यांना देण्याबाबत**

**(२६) ८६८४६ (१२-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा पाणी तंटा लवाद १ व २ यांनी महाराष्ट्राला कृष्णा खोऱ्यातील ६६६ टि.एम.सी पाणी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कृष्णा खोऱ्यातील मराठवाड्याचा भुभाग अंदाजे १०.७ टक्के आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ६६६ टि.एम.सी पाण्यापैकी ७१.२६ टि.एम.सी पाणी मराठवाड्याच्या हक्काचे आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कृष्णा खोऱ्यातील मराठवाड्याच्या हक्काचे पाणी उस्मानाबाद व बीड जिल्ह्यास देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे. कृष्णा पाणी तंटा लवाद-२ ने महाराष्ट्राला कृष्णा खोऱ्यात ६६६ अ.घ.फू. पाणी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय दिला आहे. परंतु कृष्णा पाणी तंटा लवाद-२ च्या निर्णयाला इतर राज्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अंतरिम याचिका दाखल केल्यामुळे केंद्र शासनाने हा निर्णय अद्याप अधिसुचित केलेला नाही.
(२) हे खरे नाही.
(३) लवादाने पाणी वाटप करताना उपखोरे निहाय किंवा जिल्हा निहाय केलेली नाही. खोरे / उपखोऱ्यात उपलब्ध पाण्यातूनच भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन प्रकल्पाचे / पाणी वापराचे नियोजन केले जाते. उस्मानाबाद व बीड जिल्हयाचा भाग हा कृष्णा खोऱ्याच्या भीमा उपखोऱ्यात आहे. कृष्णा पाणी तंटा लवाद-२ च्या निर्णयानुसार पाणी एका उपखोऱ्यातून दुसऱ्या उपखोऱ्यात वळविण्यास मनाई आहे.
(४) प्रथम कृष्णा पाणी तंटा लवादाच्या ५८५ अघफु पाणी वापराच्या नियोजनात उस्मानाबाद व बीड जिल्हयास २५ अघफु पाणी वापराची तरतूद असून यापैकी २४.४० अघफु पाणी वापराची कामे पुर्ण झाली आहेत. तसेच आंध्र प्रदेशच्या पोलावरम प्रकल्पाचे बदल्यात महाराष्ट्रास मिळालेल्या वाटयाच्या ५८५ अघफु पेक्षा जादाच्या १४ अघफु पाण्यापैकी ७ अघफु पाणी उपल्बध करुन देण्यास कृष्णा पाणी तंटा लवाद- मंत्रीमंडळ उपसमितीने दि.०७-०७-२००९ रोजीच्या बैठकीत सहमती दिलेली आहे. तथापी सर्वोच्च न्यायालयात याबाबत ओरिसा राज्याने दावा दाखल केला असून त्याचा निर्णय अद्याप झालेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील सांगरुळ धरणाच्या पिलरची झालेली दुरवस्था**

**(२७) ८७४७२ (१९-०८-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील सहकार तत्वावर झालेल्या सांगरुळ धरणाचे पिलर नादुरुस्त झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पिलरच्या दुरुस्तीसाठी सुमारे ७० लाख रुपये खर्च येणार असून शासनाने फक्त २० लाख रुपये मंजूर केल्यामुळे हे काम अपूर्णवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या पिलरच्या दुरुस्तीसाठी अतिरिक्त निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-११-२०१७) :** (१) होय.
(२) व (३) अंशत: खरे आहे.
सदरचा को.प. बंधारा खाजगी असल्याने या धरणाची देखभाल व दुरुस्ती सन १९५२ पासून सदर संस्थेमार्फत स्वखर्चाने करण्यात येते. तरीही शासनाने रू.१०.७२ लक्ष अनुदान संस्थेस सदर बंधारा दुरुस्तीसाठी खास बाब म्हणून २ टप्प्यात मंजूर केले आहे.

त्याअनुषंगाने जलसंपदा विभाग पत्र क्र. निधी/२०१४(२५७/१४)/ सिंव्य कामे, दि.२०/८/२०१४ अन्वये परिक्षण व दुरुस्तीसाठी लागणा-या उर्वरित निधीकरिता कोल्हापूर येथील खाजगी कंपन्यांकडून CSR Act,२०१४ मधील तरतुदींनुसार निधी उपलब्ध करण्याचा प्रयत्न क्षेत्रीय स्तरावर करण्यात यावा असे शासनाचे निर्देश आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे तेऊरवाडी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) या गावाला फाटकवाडी पाटबंधारे प्रकल्पांमार्फत घटप्रभा नदीतून पाणी मिळण्याबाबत**

**(२८) ८७५२० (२१-०८-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे तेऊरवाडी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) या गावाचा फाटकवाडी लाभक्षेत्रात समावेश करुन फाटकवाडी पाटबंधारे प्रकल्पांमार्फत घटप्रभा नदीतून पिण्यासाठी व शेतीसाठी पाणीपुरवठा करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक २४ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-११-२०१७) :** (१) होय.

मा.श्रीमती संध्यादेवी कुपेकर, विधानसभा सदस्य, चंदगड विधानसभा मतदार संघ यांनी दि.२६/०६/२०१६ व २६/०७/२०१६ रोजीचे पत्रान्वये मा.मंत्री जलसंपदा यांचेकडे सदर प्रकरणी मागणी केली आहे.
(२) घटप्रभा प्रकल्पाच्या मंजूर प्रकल्प अहवालानुसार तेऊरवाडी हे गाव प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात समाविष्ट नसल्याने सदर गावचा घटप्रभा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात समावेश करणे शक्य नाही.

तथापि, तेऊरवाडी गावचे २९५ हे. इतके क्षेत्र बांधकाम पूर्ण झालेल्या निट्टूर क्र.२ या ल.पा. प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात समाविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जीएसटी करामुळे मराठी चित्रपटांच्या तिकीटांचे दर वाढत असल्याबाबत**

**(२९) ८७६१६ (११-०८-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट राज्यात जीएसटी करामुळे मराठी चित्रपटांच्या प्रवेशिका दरात २८ टक्क्यांनी वाढ होणार असल्याने प्रेक्षकांवर अधिकचा भार पडणार आहे व त्यामुळे मराठी चित्रपट प्रेक्षकांची संख्या कमी होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच मराठी नाटकांच्या तिकिटांवरील १८ टक्के जीएसटीपैकी ९ टक्के केंद्र शासनास व ९ टक्के राज्य शासनास मिळणार असल्याने राज्य शासनास मिळणाऱ्या ९ टक्क्यांमधून सवलत देण्याची मागणी मराठी नाट्य निर्मात्यांनी मा.वित्त मंत्री महोदयांकडे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-११-२०१७) :** (१) हे खरे नाही. चित्रपटांच्या प्रवेशिकाची किंमत रु.१०० किंवा त्यापेक्षा कमी असल्यास त्यावर १८% व उल्लेखीत प्रवेशकाच्या किंमती व्यतिरिक्त २८% जीएसटी करदर आहे.
(२) हे खरे आहे. मराठी नाट्य निर्मात्यांनी जीएसटी पूर्व नाटकाच्या प्रवेशिकाची किंमत रु.५०० किंवा त्यापेक्षा कमी असल्यास त्यावर सेवा कराची आकारणी होत नव्हती. त्याचप्रमाणे जीएसटी अंतर्गत करमाफीकरीता ठेवण्यात आलेली रु.२५० ची मर्यादा रु.५०० करावी अशी मागणी केली.
(३) राज्य शासनाने नाटकांच्या तिकीटाची किंमत रु.५०० किंवा त्यापेक्षा कमी असल्यास त्यावर जीएसटीची करमाफी देण्यात यावी असा प्रस्ताव वस्तू व सेवा परिषदेस केला.
(४) लागू नाही.

---

**साकळाई (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) या परिसरासाठी**
**उपसा जलसिंचन योजना राबविण्याबाबत**

**(३०) ८७७०८ (२२-०८-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साकळाई (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) या परिसरासाठी उपसा जलसिंचन योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-११-२०१७) :** (१) साकळाई उपसा सिंचन योजनेचा प्राथमिक अहवाल सन २००० मध्ये तयार करण्यात आला होता. तथापी कुकडी प्रकल्पाकरिता उपलब्ध असलेल्या संपुर्ण पाण्याचे नियोजन यापूर्वीच झाले असल्याने या योजनेसाठी पाणी उपलब्ध नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विसापूर (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) धरणातून शेतकरी बेकायदेशीररित्या शेतीसाठी पाणी उपसा करीत असल्याबाबत**

**(३१) ८७७४७ (१८-०८-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विसापूर (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) धरणातून शेतकरी बेकायदेशीररित्या शेतीसाठी पाणी उपसा करीत असल्याने तालुक्यातील २० ते २५ नळयोजनांना पाणी मिळत नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, तद्नुसार तालुक्यातील नळ योजनांना पाणी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-११-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.
दि.२६ व २७ एप्रील, २०१७ रोजी विसापुर जलाशयातील पाणीसाठा निरंक झाल्यामुळे, पाणी पुरवठा योजनांना पाणी मिळत नव्हते.
(२) व (३) विसापूर जलाशयातील पाणीसाठा संपल्यानंतर दि.२७/०४/२०१७ ते दि.३०/०४/२०१७ या कालावधीत कुकडी डाव्या कालव्याद्वारे उन्हाळी हंगामातील पिण्याचे पाणी आवर्तनात प्राधान्याने विसापूर जलाशयात १२३ द.ल.घ.फु. पाणी सोडण्यात आले व जलाशयावरील सर्व पाणी पुरवठा योजनांचा पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र शासनाने वेधवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत अनेक प्रकल्पांची कामे पुर्ण करण्याबाबत**

**(३२) ८७८५८ (१८-०८-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने वेधवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत अनेक प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याचा “लाभ” राज्याला करुन दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या पाच वर्षात केंद्र शासनाकडून निधी वितरणासाठी विलंब होत असल्यामुळे राज्यातील अनेक वेधवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतील प्रकल्पांच्या कामावर विपरित परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१७) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे. सन २०१६-१७ पूर्वी वेगवर्धीत सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत कमी निधी प्राप्त होत असल्याने प्रकल्पांच्या कामावर विपरित परिणाम होत होता.

(३) सन २०१६-१७ पासून वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत अपूर्ण प्रकल्पांचा प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेत समावेश करण्यात आला आहे. त्यात महाराष्ट्रातील मोठ्या व मध्यम २६ बांधकामाधीन प्रकल्पांचा समावेश आहे. सदर प्रकल्पांसाठी केंद्र हिस्सा म्हणून केंद्रिय सहाय्य प्राप्त होते व राज्य हिस्सा म्हणून नाबार्ड कडून दीर्घकालीन द्रव्यता निधीच्या स्वरुपात कर्ज प्राप्त होत आहे. त्यामुळे सदर प्रकल्पांच्या कामावर विपरीत परिणाम होणार नाही याबाबत उपाय योजना करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माढा (जि.सोलापूर) तालुक्यातील सीना-माढा उपसिंचन योजनेतून टेल-टू-हेड पाणी न आल्याने भोसे येथील शेतकऱ्याने केलेली आत्महत्या

**(३३) ८७९५० (२२-०८-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माढा (जि.सोलापूर) तालुक्यातील सीना-माढा उपसिंचन योजनेतून टेल-टू-हेड पाणी न आल्याने या योजनेच्या लाभक्षेत्रात असलेल्या सापटणे, भोसे येथील शेतकरी जालींदर सुतार याने पाण्याअभावी पिक जळाल्याने नैराशातून दिनांक ०५ मे,२०१७ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाचे निकष बदलून पाणी वितरण करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी बळीराजा शेतकरी संघटनेने जिल्हाधिकारी व तहसिलदार यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने चुकीच्या पद्धतीने पाणी वितरण करण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यासह आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियास आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-११-२०१७) :** (१) नाही.
(२) होय. सदरची मागणी निवेदनाद्वारे तहसीलदार, माढा यांचेकडे करण्यांत आलेली आहे.
(३) श्री.जालिंदर सुतार हे सीना माढा उपसा सिंचन योजनेच्या उजवा कालव्याच्या वितरिका क्र.२ च्या पुच्छ भागातील लाभधारक आहेत. तथापि या पुच्छ भागातील वितरण व्यवस्थेची कामे झालेली नसल्याने सदर भागात अद्याप सिंचन क्षमता (I.P) निर्माण झालेली नाही. तसेच सदरची आत्महत्या कालव्याच्या प्रवाही सिंचनाचा लाभ न मिळाल्याने झालेली नाही. त्यामुळे संबंधीत अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबतचा प्रश्न उद्भवत नाही. संकटग्रस्त वा नैसर्गिक आपत्तीचे वेळी आर्थिक मदत महसूल खात्यामार्फत दिली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुकडी डावा कालव्याच्या अस्तरीकरणासाठी निधी मंजूर करण्याबाबत**

**(३४) *८८१४७* (१८-०८-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकडी डावा कालव्याच्या अस्तरीकरणाचे व पोंधवडी चारी खोलाईचे काम पूर्ण न झाल्याने कुकडी डाव्या कालव्याच्या शेवटी असलेल्या करमाळा तालुक्यास टेल-टू-हेड अंतर्गत पाणी कमी दाबाने मिळत असल्याने तालुक्यातील शेती व बागायतीचे नुकसान होत असल्याने कुकडी प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी (सिंचन क्षमता निर्मिती व कालव्याचे अस्तरीकरण यासाठी) शासनाने मान्यता देऊन २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अद्याप निधी देण्यात आला नसल्यास करमाळा तालुक्यातील टेलभागास झरे, वीट, पोपळज, कुंभेज जेऊर या गावातील शेतक-यांना पाणी नसल्याबाबत पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास,सदर मागणीच्या अनुषंगाने कुकडी प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-११-२०१७) :** (१) होय.

(२) करमाळा तालुक्यातील मोरवड व वीट या गावांना कुकडी डावा कालव्याच्या कि.मी. २२२ ते २३९ या भागातून सिंचनाकरिता कालव्याचे पाणी उपलब्ध करण्यात येते. तथापी कालव्याचे अस्तरीकरणाची ५० % कामे निधी अभावी बाकी असल्याने संकल्पीत विसर्ग मिळत नसल्याने पुच्छ भागातील झरे, पोफळज, कुंभेज, जेऊर या गावांना पाणी पोहचत नाही.

(३) सन २०१७-१८ मध्ये सदर प्रकल्पास रु.२०.०० कोटीची तरतुद करण्यात आली आहे.

(४) या प्रकल्पाचा सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समितीस सादर झाला असून क्षेत्रिय स्तरावरून उपस्थित केलेल्या शे-यांची पूर्तता करण्यात येत आहे. सद्यस्थितीत प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यते अभावी वाढीव खर्च करता येत नसल्याने कामे बंद आहेत.

---

**हिंगणघाट (जि.वर्धा) शहरातील वणा नदीवरील पाणी कायम राखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(३५) *८८४४२* (१२-०८-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) शहरातील वणा नदी उन्हाच्या तीव्रतेमुळे कोरडी पडली असल्याने पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगणघाट शहरात पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-११-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

नगर परिषद, हिंगणघाट यांचे पत्र क्र. ३६/२०१७,दि.२६.५.२०१७ अन्वये हिंगणघाट शहरात पाणी टंचाई स्थिती निर्माण झाली असे कळविण्यात आले. त्यांचे मागणीनुसार नांद जलाशयातुन पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले होते.

हिंगणघाट नगर परिषदेकरिता प्रकल्पिय अहवालानुसार नांद जलाशयातुन १०.५२ द.ल.घ.मी. पाणी आरक्षण मंजूर आहे. त्यानुसार पाणी पुरवठा करण्यात येते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील टेमघर धरणाचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या ठेकेदारांकडून नुकसान भरपाई वसुल करण्याबाबत

**(३६) ८८४९७ (१२-०८-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील टेमघर धरणाचे निकृष्ट दर्जाचे काम झाल्याने धरणातून पाणी गळती होवून धरणाला धोका निर्माण झाला असल्याने धरणाचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदारांविरूद्ध नुकसान भरपाई पोटी ७०० कोटी रूपयांचा दावा माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टेमघर धरणाचे काम पूर्वी प्रोग्रेसिव्ह आणि हैद्राबाद येथील श्रीनिवास या दोन ठेकेदारांनी केली होती परंतु धरणाच्या कामानंतर देखभाल आणि दुरुस्ती करणे आवश्यक असतांनाही सदर दोन्ही ठेकेदारांनी दुर्लक्ष केल्याने सबंधीतांना जलसंपदा विभागाकडून नोटीसा पाठविण्यात आल्या असता ठेकेदारांने नोटीसांना कुठलाही प्रतिसाद दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर धरणाचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या ठेकेदारांकडून नुकसान भरपाई वसुल करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-११-२०१७) :** (१) होय. संबंधीत ठेकेदारावर मुंबई उच्च न्यायालयात दावा क्र. ९०२/२०१५ व नोटीस ऑफ मोशन दावा क्र. १४१/२०१६ अन्वये रु.९६७.७९ कोटी रकमेचा दावा दाखल करण्यात आलेला आहे.

(२) होय. पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे अंतर्गत भामा आसखेड धरण विभाग, पुणे यांच्या दिनांक १०/१०/२०१३ व दिनांक १६/६/२०१७ रोजीच्या पत्राद्वारे नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत.
(३) गळती प्रतिबंधक काम हे कंत्राटदाराच्या जबाबदारीवर व खर्चाने (Risk and Cost) करण्याचे प्रस्तावित आहे. सदरच्या दोन्ही कंत्रादारास काळया यादीत टाकणेबाबतची कार्यवाही चालू आहे. कंत्राटदाराची जलसंपदा विभागाकडे असणारी अनामत रक्कम रु.२.२० कोटी जप्त करण्यात आलेली आहे. सदरचे दोन्ही कंत्राटदार तसेच जलसंपदा विभागातील तत्कालीन अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द पौड पोलीस स्टेशन, मुळशी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला असून, पोलीसांमार्फत कारवाई सुरु आहे. तसेच संबंधीत ठेकेदारावर मुंबई उच्च न्यायालय येथे रुपये ९६७.७९ कोटी रकमेचा दावा दाखल करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यात रोजगार हमी योजनेची कामे शेतकऱ्यांना देण्याबाबत**

**(३७) ८८६४७ (१२-०८-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यातील खरिप हंगामात नैसर्गिक आपत्तीमुळे पिके नष्ट झाली असल्याने या भागात रोजगार हमी योजनेची कामे सुरू करून मागेल त्याला काम देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागात तातडीने रोहयोची कामे शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०२-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) पांढरकवडा तालुक्यामध्ये ७४ ग्रामपंचायती असून सन २०१७-१८ या अर्थिक वर्षात ४.०८ लक्ष मनुष्यदिन निर्मितीचे उद्दिष्ट असून पंचायतसमिती मार्फत घेण्यात आलेल्या कामांवर ऑगस्ट २०१७ अखेर १.७० लक्ष मनुष्यदिन निर्मिती झाली आहे. मजुरांच्या मागणीप्रमाणे त्यांना कामे उपलब्ध करुन देण्यात येतात. त्याचप्रमाणे जनजागृतीसाठी मग्रारोहयो अंतर्गत प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी ग्रामरोजगार दिनाचे आयोजन करण्याबाबत सर्व ग्रामपंचायतींना सुचविण्यात आले आहे. तसेच, ग्रामपंचायत स्तरावर योजनेच्या यशस्वी अंमलबजावणी करिता फलक लावण्यात आले. तसेच, पुरशा प्रमाणात नविन मजुरांची नोंदणी करण्यासाठी नमुना-१, काम मागणी अर्ज नमुना-४ उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यानुसार मजुरांच्या मागणीप्रमाणे त्यांना विहीत कालावधीत काम उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही पंचायत समिती स्तरावरुन सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यातील वारणा प्रकल्पांतर्गत असलेले पुल व साकवाची झालेली दुरवस्था

**(३८) ८८६५५ (१८-०८-२०१७). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील वारणा प्रकल्पाच्या ० ते २६ कि.मी. लांबीतील डाव्या कॅनॉलवरील अनेक लहान पुल व साकव लोखंडी असल्याने गंजले असून ते निकामी झाले असल्याने पुल व साकव यांची आरसीसी पध्दतीने पुनर्बांधणी करण्याबाबत ग्रामस्थांकडून मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार पुल व साकव यांची आरसीसी पध्दतीने पुनर्बांधणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-११-२०१७) :** (१) होय.

(२) निधी उपलब्धतेनुसार पुलांची कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## सांगली जिल्ह्यातील वारणा प्रकल्पांतर्गत कांळुद्रे, खराळे व चिंचेवाडी या गावांच्या सिंचन योजनाचे काम अपूर्णवस्थेत असल्याबाबत

**(३९) ८८६६३ (१८-०८-२०१७). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील वारणा प्रकल्पाच्या डाव्या कॅनॉलमधून कांळुद्रे, खराळे व चिंचेवाडी या तीन वाडीच्या शेतीकरिता पाणी पुरवठा करणारी सिंचन योजना अपूर्णवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे पंप हाऊस व रायजिंग मेनचे काम दिर्घकाळ अपूर्ण असल्याने त्या दरम्यान तेथील पंप व विद्युत उपकरणांची चोरी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-११-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर चोरीबाबत स्थानिक स्तरावर चौकशी केली असता त्याचा तपास न लागल्याने पोलीस स्टेशन, कोकरूड, ता.शिराळा, जि.सांगली, यांचेकडे FIR दाखल करण्यात आला असून, पुढील पोलीस तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतकऱ्यांकडून वसूल करण्यात येणाऱ्या पाणी पट्टीमधुन धरणांच्या कालव्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४०) ८८७०६ (१८-०८-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धरणांचे पाणी सिंचनासाठी वापरणाऱ्या शेतकऱ्यांकडून वसूल करण्यात येणाऱ्या पाणी पट्टीमधुन धरणांच्या कालव्यांची दुरुस्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चासकमान प्रकल्प (ता.खेड, जि.पुणे) मधून कालवे दुरुस्तीचे एकूण किती प्रस्ताव शासनास सादर केले आहेत,

(३) असल्यास, कालवे दुरुस्तीच्या मागणीच्या प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-११-२०१७) :** (१) होय.

सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टीच्या रक्कमेतून महामंडळास उपलब्ध होणा-या निधीतून सदर कामे हाती घेण्याबाबत जलसंपदा विभागाने शासन निर्णय क्र.देदु-२०१५ /(८३६/२०१५) / सिं.व्य (कामे), दि.१७.११.२०१६ निर्गमित केला आहे.

(२) शासनास प्रस्ताव सादर केलेले नाहीत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील भीमा, सीना, माण, बोरी आणि भोगावती या पाच नद्यांवरील बंधा-याच्या लोखंडी दरवाज्यांची झालेली दुरवस्था**

**(४१) ८८९६४ (१२-०८-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील भीमा, सीना, माण, बोरी आणि भोगावती या पाच नद्यांवरील बंधाऱ्याच्या दरवाज्यांची दूरवस्था झाल्याने बंधाऱ्यात पाणीच थांबत नाही व पाणी वाहुन जाऊन उन्हाळ्यात येथील पिकांचे नुकसान होत असल्याचे माहे डिसेंबर,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाटबंधारे विभाग, सोलापूर यांनी दीड वर्षापूर्वी या बंधाऱ्याच्या दरवाजांसाठी २६ कोटींचे अंदाजपत्रक तयार करुन शासनास सादर करुनही निधी मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंधाऱ्याच्या लोखंडी दरवाज्याची पाहणी केली आहे काय व त्यानुसार शासनाने निधी देऊन सदर नद्यांवरील बंधाऱ्याचे गंजलेले दरवाजे बदलण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-११-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

को.प.बंधा-यामध्ये पाणी अडविले जाते परंतु काही दरवाजे खराब असल्यामुळे पाण्याची गळती होते. तथापि,आवश्यकतेनुसार गळतीप्रतिबंधक उपाययोजना करण्यात येते.
(२) अंशत: खरे आहे.

बंधाऱ्याच्या दरवाजासाठीचे अंदाजपत्रकावरील शासनाने उपस्थित केलेल्या शेऱ्यांची पूर्तता करणेचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे. तथापि यांत्रिकी विभागाकडे बर्ग्यांची मागणी नोंदवली आहे. त्यासाठी यांत्रिकी विभागास रू.९.७३ कोटी एवढा निधी उपलब्ध करून दिलेला आहे.
(३) व (४) क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांचेकडून याबाबत पाहणी करण्यात आली आहे. गंजलेले दरवाजे बदलणे/दुरुस्ती करिता यांत्रिकी विभागाकडे ९६०० नवीन बर्ग्यांची मागणी करण्यात आली आहे. त्यासाठी महामंडळाकडून रु. ९.७३ कोटी इतका निधी यांत्रिकी विभागास उपलब्ध करून देण्यात आला आहे.त्या निधीतून यांत्रिकी विभागाकडून आतापर्यंत २४८८ नवीन बर्गे प्राप्त झाले आहेत. तसेच जलयुक्त शिवार योजने अंतर्गत ८२३ बर्गे यांत्रिकी विभागाकडून प्राप्त झाले आहेत.

---

## छपाई कागदांच्या वाढीव किंमती कमी करण्याबाबत

**(४२) ८९०६६ (१२-०८-२०१७). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात छपाई कागदांच्या किंमतीमध्ये गेल्या तीन महिन्यात जवळपास ३० टक्क्यापेक्षा अधिक वाढ झाली असल्याने छपाई कागदाच्या किंमती कमी करण्याबाबतचे निवेदन संबंधित पदाधिकाऱ्यांनी मा.वित्त मंत्री, मा.उद्योग मंत्री तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग यांना माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, छपाई कागदाच्या वाढीव किंमतीमुळे राज्यासह देशपातळीवरील ८० टक्के छपाई व वेष्टन (packaging) व्यवसायिकांचे उद्योग डबघाईला आले असल्याने छपाई कागदाच्या किंमती कमी करण्यात याव्यात अन्यथा छपाईच्या कामात १५ टक्के वाढ करावी लागेल असे राज्यातील अडीच लाख छपाई व्यवसायिक असलेल्या बॉम्बे मास्टर्स प्रिंटर्स असोसिएशन तसेच नॅशनल अॅण्ड लोकल असोसिएशन ऑफ प्रिंटर्स मुंबई या संघटनाच्या पदाधिकारी यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत जाहीर केले असल्याचे दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनानुसार छपाई कागदाच्या किंमती कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-११-२०१७) :** (१) हे खरे नाही. या संदर्भात मा.वित्त मंत्री यांच्या कार्यालयास निवेदन प्राप्त झाल्याचे निदर्शनास येत नाही, मात्र दिनांक १८ एप्रिल २०१७ दैनिक लोकसत्ता मध्ये निवेदनाबाबतची बातमी प्रसिद्ध झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे आहे. दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजीच्या दैनिक लोकसत्ता मधील बातमीनुसार सदर मागणी केल्याचा उल्लेख करण्यात आला आहे.
(३) दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजीच्या दैनिक लोकसत्ता मधील बातमीनुसार कागदाच्या किंमतीत गेल्या दोन महिन्यात ३० टक्क्यांहून अधिक झाल्याने देशातील ८० टक्के छपाई व पॅकेजिंग व्यावसायिकांचे उद्योग डबघाईला आले आहेत असा उल्लेख आहे. वस्तूच्या किंमतीत साधारणत: वस्तूचा बाजार ठरवत असते. शासनामार्फत वस्तूच्या किंमतीवर होणारा परिणाम फक्त वस्तूवरील कराशी निगडीत असतो. कागदाच्या विक्रीकरात सप्टेंबर, २०१६ पासून कोणताही बदल करण्यात आलेला नाही. सदर कराचा दर ६ % आहे. त्यामुळे दिनांक १८ एप्रिल, २०१७ च्या बातमीमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे कागदाच्या किंमती गेल्या दोन महिन्यात झालेल्या वाढीशी राज्य शासनाचा संबंध नाही.
(४) लागू नाही.

---

**अणदूर (ता.गगनबावडा, जि.कोल्हापूर) येथील विहिरीला विविर पडल्याबाबत**

**(४३) ८९७३७ (१२-०८-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अणदूर (ता.गगनबावडा, जि.कोल्हापूर) येथील पाणीसाठा करणाऱ्या बंधाऱ्याच्या मुख्य गेटवर असणाऱ्या (विमोचक) पाणी सोडणाऱ्या विहिरीला विविर पडल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विहीरीची शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, त्यानुसार सदर विहीर दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-११-२०१७) :** (१) व (२) सदर विहीरीची मे २०१७ मध्ये विभागामार्फत पाहणी केली असून त्याठिकाणी विविर पडलेले नसून विहीरीच्या वरील भागातील दगडी बांधकामास भेगा पडल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) विहीर दुरुस्तीचे कामासाठी चालू पावसाळी हंगामानंतर स्थापत्य विभाग व यांत्रिकी विभाग यांचेमार्फत संयुक्त पाहणी करुन निधी उपलब्धतेनुसार काम करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील प्रजिमा १२४ वरील केत्तूर नं.२ ते पोलमवाडी रस्त्यावर पुल व पोहोचरस्ता बांधण्याबाबत**

**(४४) ८९७९६ (१८-०८-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील प्रजिमा १२४ वरील केत्तूर नं.२ ते पोलमवाडी दरम्यानचा रस्ता ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून केलेला रस्ता उजनीधरण पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर पाण्याखाली जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर ठिकाणी पुल व पोहोचरस्ता बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-११-२०१७) :** (१) नाही. उजनी धरण पूर्ण संचय पातळीस (तलांक-४९६.८३० मी) आलेनंतर देखील सदरहू रस्ता पाण्याखाली जात नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सिंचन क्षेत्रात सुधारणा करण्याबाबत**

**(४५) ८९८३६ (२१-०८-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सिंचन क्षेत्रासाठी आतापर्यंत किती कोटी रुपये जलसंपदा विभागाने खर्च केले आहेत व किती हेक्टर सिंचन क्षेत्रात वाढ झाली आहे,
(२) असल्यास, सिंचन क्षेत्रात काही सुधारणा करण्यासाठी शासनाने कालवा सल्लागार समित्यांची पुनर्रचना केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सिंचनक्षेत्रासाठी करण्यात आलेल्या सुधारणांचे स्वरुप काय आहे व यामुळे किती टक्के पाण्याची बचत होणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०९-११-२०१७) :** (१) जलसंपदा विभागामार्फत स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते पंचवार्षिक योजना पूर्वकाळापर्यंत (१९५१ पर्यंत) महाराष्ट्रात एकूण रु.१६.६० कोटी इतकी गुंतवणूक व २.७४ लक्ष हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण झाली होती. जलसंपदा

विभागामध्ये त्यानंतर प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची माहिती संकलित स्वरुपात उपलब्ध नाही. उपलब्ध माहितीनुसार आतापर्यंत ढोबळमानाने सुमारे १ लक्ष कोटी इतका खर्च राज्यातील सिंचन क्षेत्रासाठी खर्च केला आहे. जून-२०१५ अखेर ४९.१० लक्ष हेक्टर (अस्थायी) सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

(२) होय. जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक : कासस-२०१५/प्रक्र-१६२/२०१५/सिंव्य (महसूल), दि.१८ मार्च, २०१६ अन्वये सिंचन प्रकल्पावरील कालवा सल्लागार समित्यांची पुनर्रचना करण्यात आली आहे.

(३) कालवा सल्लागार समितीचे अध्यक्ष यापूर्वी कार्यकारी अभियंता होते. समितीचे स्वरुप लोकाभिमुख करण्याच्यादृष्टीने समितीचे अध्यक्ष जलसंपदा मंत्री/पालकमंत्री/राज्यमंत्री यांना नेमण्यात आले आहे. तसेच, सिंचन व्यवस्थापन संबंधी इतर उपभोक्ता यांचा समावेश समितीत करण्यात आला आहे. सुधारण्याचे स्वरुप प्रशासकीय स्वरुपाचे असल्यामुळे त्याद्वारे पाण्याची तुटीत होणाऱ्या बचतीची परिगणना करणे शक्य नाही.

---

## सूर्या प्रकल्पाच्या कालव्यांची झालेली दुरवस्था

**(४६) ८९८४९ (१२-०८-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणी धरणाच्या सूर्या नदीचे कालवे फुटलेले, भराव खचल्याने बुजून गेलेले, कालव्यांत काटेरी झुडपे वाढलेल्या अवस्थेत असल्याने शेतकऱ्याना शेतीसाठी पाण्याची कमतरता निर्माण होत असून कालव्यांची साफसफाई व दुरुस्तीकडे पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्याची शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुसार सुर्या नदीच्या कालव्याची साफसफाई करुन दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-११-२०१७) :** (१) नाही. सूर्या कालव्याची बांधकामे ३० ते ३५ वर्षे जूनी आहेत. मोठ्या प्रमाणावर पडणाऱ्या पावसामुळे वितरण प्रणालीतील मुख्य कालवे, शाखा कालवे तसेच वितरीका, लघुपाट, उपलघुपाटाचे मातीकामातील भराव व बांधकामे काही प्रमाणात क्षतिग्रस्त होत आहेत.

तथापि, कालव्याची भरावाची दुरूस्ती व झाडे झुडपे काढणे इत्यादी अत्यावश्यक स्वरूपाची दुरूस्ती कामे उपलब्ध निधीनुसार करण्यात येवून मागणी केलेल्या सर्व शेतक-यांना पाणी देवून सिंचन हंगाम सुरळीतपणे पार पाडण्यात येतो.

(२) क्षेत्रीय पाहणी मध्ये सूर्या कालव्याची वितरण प्रणालीतील मुख्य कालवे, शाखा कालवे तसेच वितरीका, लघुपाट, उपलघुपाटाचे मातीकामातील भराव व बांधकामे काही प्रमाणात क्षतिग्रस्त झालेले आहेत. झाडे झुडपे वाढलेली आहेत.

(३) जलसंपदा विभागाकडील यांत्रिकी संघटनेचे यंत्रसामुग्रीद्वारे कालव्याची साफसफाई करून सिंचनासाठी पाणी सोडण्यात येणार आहे.

कालव्याच्या कायमस्वरूपी दुरूस्तीच्या अनुषंगाने अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर असून त्यात बांधकामांचे मजबुतीकरण व वहनक्षमता पुनर्स्थापित करण्यासाठी आवश्यक कामांचा अंतर्भाव करण्यात येत आहे. कालव्याची आवश्यक दुरूस्ती शासन निर्णय दि.१७/११/२०१६ अन्वये महामंडळाकडे जमा होणारी सिंचन व बिगर सिंचन पाणी पट्टी रक्कमेतून करण्याचे प्रस्तावित आहे. तद्नंतर कामे पूर्ण करुन कालवा/वितरीकेतून शेतापर्यंत पाणी पोहचवणे शक्य होवून निर्मित सिंचन क्षमता व प्रत्यक्ष सिंचन क्षमता यातील तफावत दूर होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील शाई व काळू धरणांची कामे अपूर्णवस्थेत असल्याबाबत**

**(४७) ९०१३१ (१२-०८-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अजित पवार (बारामती), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील काळू नदीवर व शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील शाई नदीवर धरणे उभारण्याचा प्रस्ताव असून सदर धरण प्रकल्पे उभारण्याची प्रक्रिया अद्यापही अपुर्णवस्थेत असल्याने सदरचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदामंत्री यांचेकडे माहे एप्रिल,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची धरणे बांधण्यासंदर्भात आतापर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार काळू व शाही नदीवरील धरणाचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-११-२०१७) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या दिनांक १/३/२०१२ रोजीच्या अंतरीम आदेशान्वये काळू धरणाच्या बांधकामास स्थगिती दिली असल्याने काळू धरणाचे काम बंद आहे व शाई प्रकल्पाचे काम प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे बंद आहे.

काळू व शाई प्रकल्प सुरू करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

१) वनविभागाने कळविलेली NPV ची रक्कम (काळू - २२८.२३ कोटी व शाई १४७.५१ कोटी) भरणेबाबत मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणास दि.२६/४/२०१६ अन्वये कळविण्यात आले असून अद्याप रक्कम प्राप्त झालेली नाही.

२) मा.पालकमंत्री, ठाणे जिल्हा यांनी शाई प्रकल्पाबाबत दि.२५/७/२०१६ रोजी जलसंपदा विभाग व संघर्ष समिती यांची बैठक घेवून धरणाचे काम सुरू करण्याबाबत चर्चा केली.

३) दि.२३/९/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार ACB मार्फत चौकशी सुरू असलेल्या प्रकल्पांची निविदा रद्द करणेबाबत सुचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार निविदा शर्त क्र. १५ (१) नुसार निविदा रद्द करणेच्या प्रस्तावास मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई यांनी मान्यता दिलेली आहे. त्या विरोधात ठेकेदाराने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केलेली असून सुनावणी सुरू आहे.

मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली समिती कक्ष, मंत्रालय,मुंबई येथे दि.१५.०५.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये भविष्यात पिण्याचे पाणी पुरवठा करणेसाठी लागणारी पाण्याची गरज विचारात घेऊन काळू व शाई हे दोन्ही प्रकल्पांची कामे हाती घेणे आवश्यक असल्याचे सूचित केले असून त्या अनुषंगाने कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सुर्या (जि.पालघर) प्रकल्पातंर्गत येणाऱ्या डाव्या आणि उजव्या तीर कालव्यासाठी भूसंपादीत केलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(४८) ९०५०९ (१२-०८-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील सुर्या प्रकल्पासाठी १९८० मध्ये डाव्या आणि उजव्या तीर कालव्यांकरता ८४ शेतकऱ्यांची ३०० हेक्टर जमीन जलसंपदा विभागाने भुसंपादन करुन घेतली असताना या सर्व शेतकऱ्यांना गेल्या ३५ वर्षापासून नुकसान भरपाई मिळाली नसल्याची बाब दिनांक १० मे २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठीचा प्रस्ताव सादर करा असा आदेश सन २०१४ मध्ये ठाणे जिल्ह्याधिकारी यांनी देऊनही अद्याप हे प्रस्ताव सादर करण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमिन वन खात्याची नसल्याबाबत उप वन संरक्षकांनी वन अधिनियम १९२७ चे कलम ३५ च्या तरतूदीनुसार वन खात्याचा संबंध नसल्याचे निदर्शनास आणूनही संबंधीत शेतकऱ्यांना अद्यापी नुकसान भरपाई देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासह जमीनीचा मोबदला व नुकसान भरपाई देण्यास विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-११-२०१७) :** (१) सूर्या प्रकल्पाच्या कालव्यासाठी संपादित करावयाच्या ४२०.९३ हे. जमिनीपैकी १४४.८०० हे. जमिनीचे अंतिम निवाडे घोषित (सन २००० ते २००८) झाले असून भूसंपादनापोटी रु ३२९.१४ लक्ष अदा करण्यात आले असून उर्वरीत २७५.९३ हे. जमिनीचे भूसंपादन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने घेणेबाबतच्या कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.
(२) जिल्हाधिकारी, पालघर यांचे दि.११/०४/२०१७ रोजीच्या पत्रानुसार जमिनीचे भूसंपादन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने घेणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावरून प्रगतीपथावर आहे.
(३) सूर्या प्रकल्पाच्या कालव्यासाठी संपादित करावयाच्या २७५.९३ हेक्टर जमिनीपैकी एका प्रकरणी ०.३३ हेक्टर जमिनीबाबत वन अधिनियम, १९२७ चे कलम ३५ च्या तरतुदीनुसार वनखात्याचा संबंध येत नसल्याचे उपवनसंरक्षक, डहाणू यांनी कळविले आहे. तथापि सदर जमिनीच्या संपादनाबाबत देखील खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने घेणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावरून प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सालेकसा (जि.गोंदिया) तालुक्यातील गांधी टोला ग्रामपंचायत अंतर्गत येणा-या सालईटोला/बापुटोला येथे पांदण रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४९) ९१०९९ (२१-०८-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सालेकसा (जि.गोंदिया) तालुक्यातील गांधी टोला ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या सालईटोला/बापुटोला येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत पांदण रस्ता खडीकरणाचे काम सुरू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील रस्त्याच्या कामात मुरूम टाकण्याऐवजी माती टाकण्यात येत असून हे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे,
(४) असल्यास, चौकशीनुसार रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०२-११-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) सदर कामावर चांगल्या प्रतीच्या साहित्यांचा वापर करण्यात आला असून कामावर कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार झालेला नाही. गावातील काही युवक कामाच्या ठिकाणी गेले होते परंतु त्यांनी काम बंद केलेले नाही. याबाबत लेखी तक्रार पंचायत समिती सालेकसा कार्यालयास प्राप्त झालेली नसल्याने चौकशी करण्यात आलेले नाही. सदर काम सुरु असून साहित्याचे देयक अदा करण्यात आलेले नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सॅनेटरी नॅपकिन्स 'जीएसटी' मुक्त करण्याबाबत**

**(५०) ९२९५० (१९-०८-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतात अहोरात्र राबणाऱ्या, रोजंदारीवर काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या गोरगरीब महिलांना जीएसटी लागू झाल्यास सॅनेटरी नॅपकिन्स विकत घेणे अशक्य होणार असल्याने सॅनेटरी नॅपकिन्स जीएसटी मुक्त करण्याची मागणी विविध सामाजिक संस्था, महिला वर्ग यांच्याकडून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहु मागणीच्या अनुषंगाने सॅनेटरी नॅपकिन्स 'जीएसटी' मुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) वस्तू व सेवा कर अधिनियमांतर्गत वस्तू व सेवावरील कराचे दर शिफारस करण्याचे अधिकार वस्तू व सेवा कर परिषदेस आहेत व परिषदेने शिफारस केलेल्या दराप्रमाणेच कराची आकारणी करण्याची शासनाची भूमिका आहे.
(३) लागू नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.